जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2026
पुण्यनगरी

# साहित्यिकांनी निर्भयपणे लिहिणे गरजेचे : डॉ. कामत

गडहिंग्लज : प्रतिनिधी

सत्ता आणि सुधारणा हे राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. साहित्यिकांनी परिवर्तन आणि प्रबोधनाचे कार्य साहित्यातून केले पाहिजे. त्यांनी साहित्यातून मांडलेले विचार समाजासाठी दिशादर्शक असतात. सत्याचा आणि नैतिकतेचा आवाज संवेदनशील साहित्यिकांनी बुलंद केला पाहिजे. त्यांच्या निर्मितीच्या मागे वेदना, तळमळ असावी. त्यातून चांगले विचार समाजात पेरण्याची ताकद निर्माण होते. सत्याचा आणि नैतिकतेचा आवाज बनण्यासाठी साहित्यिकांनी निर्भय होऊन लिहिणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

येथील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. किसन कुराडे यांच्या साहित्य, शिक्षण, समाजप्रबोधन आणि वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांचा जाहीर सत्कार व त्यांच्या निवडक साहित्यावर आधारित 'प्रबोधक प्रा. किसनराव कुराडे निवडक साहित्य (खंड-१)' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभप्रसंगी ते बोलत होते.

सुरेश केसरकर यांनी स्वागत केले. अनिल म्हमाने यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. श्रीमंत कोकाटे म्हणाले, प्रा. किसन कुराडे स्त्रीवादी लेखक आहेत. साहित्यिकांनी मानवी विकासाच्या दृष्टिकोनातून आपली लेखणी चालवणे गरजेचे आहे. भारतीय संस्कृती स्त्रीसत्ताक असून, स्त्रियांना सन्मानाने वागण्याची नवी संस्कृती आपण तयार केली पाहिजे. यावेळी नितीन चंदनशिवे म्हणाले, आपले साहित्य येणाऱ्या पिढीला शहाणपण शिकवणारे असले पाहिजे, असे सांगितले. प्रा. किसन कुराडे यांनी, ग्रंथ लेखनामागील भूमिका स्पष्ट केली. अनिल म्हमाने, डॉ. शोभा चाळके, सुरेश केसरकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी क्रांतिदेवी कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, आलोक जत्राटकर, शिवाजी परुळेकर, सुनील जाधव, अनिल कलकुटकी, गंगाधर म्हमाने, डॉ. दिनकर पाटील, सिकंदर तामगावे, लाला नाईक, मच्छिंद्र कांबळे, संजयकुमार अर्दाळकर, अशोक मानकर, प्रा. बीनादेवी कुराडे, दिग्विजय कुराडे, कमल कुरळे, प्रा. आनंद नाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अभिजित मासुर्लीकर यांनी सूत्रसंचालन केले. अंतिमा कोल्हापूरकर यांनी आभार मनले.

जनसंपर्क कक्ष
13 AUG 2026 वार्ता सम्राट शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा.किसनराव कुराडे यांच्या सत्कार ; प्रबोधक' ग्रंथाचे प्रकाशन

## साहित्यिकांनी परिवर्तन आणि प्रबोधनाचे कार्य साहित्यातून केले पाहिजे: कुलगुरू डॉ.कामत

कोल्हापूर /प्रतिनिधी : सत्ता आणि सुधारणा हे राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. प्रा. किसनराव कुराडे हे समाजाला दिशा दाखविणारे दीपस्तंभ आहेत. साहित्यिकांनी परिवर्तन आणि प्रबोधनाचे कार्य साहित्यातून केले पाहिजे. त्यांनी साहित्यातून मांडलेले विचार समाजासाठी दिशादर्शक असतात.असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते प्रा.किसनराव कुराडे यांच्या साहित्य, शिक्षण, समाजप्रबोधन आणि वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांचा जाहीर सत्कार व त्यांच्या निवडक साहित्यावर आधारित निर्मिती प्रकाशन प्रकाशित डॉ. कपिल राजहंस आणि डॉ. शोभा चाळके-म्हमाने संपादित 'प्रबोधक प्रा. किंसनराव कुराडे निवडक साहित्य (खंड-१)' या १ हजार पानांच्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ राजर्षी शाहू स्मारक भवन येथे आयोजित करण्यात आला होता यावेळी कुलगुरू डॉ.कामत बोलत होते.यावेळी डॉ. श्रीमंत कोकाटे,आलोक जत्राटकर व दंगलकार नितीन चंदनशिव यांची प्रमुख उपस्थिती होती

यावेळी बोलतांना कुलगुरू डॉ.कामत म्हणाले,सत्याचा आणि नैतिकतेचा आवाज संवेदनशील साहित्यिकांनी बुलंद केला पाहिजे. त्यांच्या निर्मितीच्या मागे वेदना, तळमळ असावी. त्यातून चांगले विचार



प्रा. किसनराव कुराडे यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ.कामत व दंगलकार नितीन चंदनशिवे यावेळी डावीकडून आलोक जत्राटकर, प्राचार्य डॉ.एस.एम.कदम, अनिल म्हमाने, डॉ. श्रीमंत कोकाटे,सुरेश केसरकर, क्रांतीदेवी कुराडे, अंतिमा कोल्हापूरकर आणि मान्यवर

समाजात पेरण्याची ताकद निर्माण होते. सत्याचा आणि नैतिकतेचा आवाज बनण्यासाठी साहित्यिकांनी निर्भय होऊन लिहिणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी ज्येष्ठ लेखक व विचारवंत डॉ. श्रीमंत कोकाटे म्हणाले, प्रा.किसनराव कुराडे स्त्रीवादी लेखक आहेत.साहित्यिकांनी मानवी विकासाच्या दृष्टिकोनातून आपली लेखणी चालवणे गरजेचे आहे. भारतीय संस्कृती स्त्रीसत्ताक असून स्त्रियांना सन्मानाने वागण्याची नवी संस्कृती आपण तयार केली पाहिजे.

यावेळी साहित्यिक दंगलकार नितीन चंदनशिवे म्हणाले, आपले साहित्य येणाऱ्या पिढीला शहाणपण शिकवणारे असले पाहिजे. सामान्य माणसाला न्याय देणाऱ्या साहित्यातून नवे सुचण्याची प्रक्रिया सर्वोच्च आनंद देणारी असते. आम्ही मात्र डावा उजवा करीत आहोत. अशा या परिस्थितीत साहित्यिकांनी मानव मुक्तीसाठी प्रेरक ठरेल असे साहित्य लिहिले पाहिजे.

प्रा. किसनराव कुराडे यांनी ग्रंथ लेखनामागील भूमिका स्पष्ट केली.प्रकाशक अनिल म्हमाने, ग्रंथाच्या संपादिका डॉ. शोभा चाळके, सुरेश केसरकर, अंतिमा कोल्हापूरकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी क्रांतीदेवी कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, आलोक जत्राटकर, शिवाजीराव परुळेकर, सुनिल जाधव, अनिल कलकुटकी, डॉ. दिनकर पाटील, सिकंदर तामगावे, संजयकुमार अर्दाळकर, अशोक मानकर, गडहिंग्लज नगरपालिकेच्या नगरसेविका प्रा.बिनादेवी कुराडे, शिवराज विद्या संकुलाचे उपाध्यक्ष दिग्विजय कुराडे, बसवराज आजरी, साहित्यिक कमल कुरळे, प्रा.आनंद नाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत सुरेश केसरकर, प्रास्ताविक अनिल म्हमाने सूत्रसंचालन अभिजीत मासुर्लीकर यांनी तर अभार अंतिमा कोल्हापूरकर यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2026
पुण्यनगरी

# वारसा लष्करी इतिहासाचा; प्रेरक अन् अभिमानाचा

## शिवाजी विद्यापीठात दुर्मीळ लष्करी छायाचित्र प्रदर्शनास प्रारंभ

**कोल्हापूर :** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराचा इतिहास, जवानांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात बुधवारी दुर्मीळ लष्करी छायाचित्रांच्या दोनदिवसीय प्रदर्शनास प्रारंभ झाला. विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि पुणे येथील ऑलिव्ह ग्रीन व्हेंचर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शनाचे प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सुरू असलेल्या या प्रदर्शनात सन १९४७, १९६२, १९६५, १९७१ आणि कारगिल इत्यादी युद्धांमधील अत्यंत दुर्मीळ अशा ३५० छायाचित्रांचा समावेश आहे. या निमित्ताने विद्यापीठ परिसरात भारतीय लष्करी इतिहासाशी संबंधित दुर्मीळ छायाचित्रे, नकाशे, ऐतिहासिक दस्तऐवज यांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता देशाचा इतिहास, राष्ट्रीय सुरक्षा आणि राष्ट्रसेवेची मूल्ये समजून घेणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशाविषयी अभिमान, कर्तव्यभावना आणि राष्ट्रनिष्ठा दृढ होण्यास निश्चित मदत होईल.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित लष्करी छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत मान्यवर.

### माजी लष्करी अधिकाऱ्यांनी जागवल्या युद्धाच्या आठवणी

प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आणखी एक महत्त्वपूर्ण परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात माजी लष्करी अधिकारी आणि अभ्यासकांनी विविध भारतीय युद्धांच्या स्मृतींना उजाळा दिला. लेफ्टनंट कर्नल अवधूत ढमढेरे यांनी १९६५ च्या युद्धातील 'असल उत्तर'ची लढाई आणि १९७१ च्या युद्धातील 'बसांतर' याविषयी विद्यार्थ्यांनी माहिती दिली. तसेच नितीन शास्त्री यांनी १९६२ चे युद्ध आणि १९६५ च्या युद्धाची पार्श्वभूमी या विषयावर, तर जे. आर. भट यांनी १९६५ मधील सर्जिकल स्ट्राईक (पेशावरवरील बॉम्बहल्ला) याविषयी माहिती दिली.

लेफ्टनंट कर्नल अवधूत ढमढेरे यांनी भारतीय लष्करी इतिहासातील विविध घटनांमधून सैनिकांचे शौर्य, नेतृत्व, शिस्त आणि त्याग यांची माहिती दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, सुरेखा अडके आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन गुरुवार, दि. १३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 AUG 2026 जनप्रवास

# विद्यापीठात लष्करी छायाचित्र प्रदर्शनास प्रारंभ

## प्रदर्शनात भारतीय लष्कराचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराचा इतिहास, जवानांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात आज दुर्मिळ लष्करी छायाचित्रांच्या दोनदिवसीय प्रदर्शनास प्रारंभ झाला. विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि पुणे येथील ऑलिव्ह ग्रीन व्हेंचर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन प्रकुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सुरू असलेल्या या प्रदर्शनात सन १९४७, १९६२, १९६५, १९७१ आणि कारगील इत्यादी युद्धांमधील अत्यंत दुर्मिळ अशा ३५० छायाचित्रांचा समावेश आहे. देशाच्या संरक्षणासाठी सैनिकांनी दिलेल्या योगदानाची माहिती करून देण्यात आली. विद्यापीठ परिसरात भारतीय लष्करी इतिहासाशी संबंधित दुर्मिळ छायाचित्रे, नकाशे, ऐतिहासिक दस्तऐवज यांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे.



**लष्करी छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत लेफ्टनंट कर्नल अवधूत ढमढेरे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सुरेखा अडके, डॉ. सावळीराम घाणे, डॉ. कबीर खराडे आदी.**

लेफ्टनंट कर्नल अवधूत ढमढेरे यांच्यासह नितीन शास्त्री आणि जे. आर. भट यांनी उपस्थितांना त्यांची माहिती दिली.

लेफ्टनंट कर्नल अवधूत ढमढेरे यांनी भारतीय लष्करी इतिहासातील विविध घटनांमधून सैनिकांचे शौर्य, नेतृत्व, शिस्त आणि त्याग यांची माहिती दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, सुरेखा अडके यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भारतीय युद्धांच्या स्मृतींना उजाळा**

लेफ्टनंट कर्नल अवधूत ढमढेरे यांनी १९६५ च्या युद्धातील 'असल उत्तर'ची लढाई आणि १९७१च्या युद्धातील 'बसांतर' याविषयी माहिती दिली. तसेच, नितीन शास्त्री यांनी १९६२ चे युद्ध आणि १९६५ च्या युद्धाची पार्श्वभूमी या विषयावर तर, जे.आर. भट यांनी १९६५ मधील सर्जिकल स्ट्राईक (पेशावरवरील बॉम्बहल्ला) याविषयी सविस्तर माहिती दिली.

1 3 AUG 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्येयाप्रति वेडी असलेली व्यक्तीच यशस्वी होते : कुलसचिव शिंदे

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

जे यश मिळाले आहे त्यावर समाधान मानाल तर प्रगती थांबेल. त्यामुळे मिळालेल्या यशावर न थांबता पुढचे पाऊल टाकत राहा. ध्येयाप्रति वेडी असलेली व्यक्तीच यशस्वी होते, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. येथील डॉ. घाळी कॉलेजच्या वतीने पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी ते बोलत होते.

शिंदे पुढे म्हणाले, अवघड आहे ते सहज करा, सहज ते सुंदर करा, सुंदर ते जतन करा आणि जे जतन केलेय ते वापरायला शिका, हेच यशस्वी होण्याचे




**गडहिंग्लज : डॉ. घाळी कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. उपस्थित प्रा. दत्ता पाटील व अन्य.**

तंत्र आहे आणि याचा उपयोग आता तुमच्या या शैक्षणिक प्रथम वर्षापासून कराल तर तुम्ही खूप मोठ्या पदावर पोहचाल. तुमच्या स्वप्नांना ताकद देण्याचे काम डॉ. घाळी महाविद्यालयातील प्रत्येक घटक करेल. यासाठी या महाविद्यालयातील उपलब्ध सर्व गोष्टींचा उपयोग करून घ्या.

प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. प्रा. नागेश मासाळ यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी डॉ. महेश चौगुले, प्रा. पी. डी. पाटील यांचा आणि पोलीस दलामध्ये निवड झालेल्या कृष्णा माने, स्वप्नाली माने, मोनिका आरबोळे, उमेश आरबोळे यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. मिलिंद पाटील, डॉ. शिवानंद मस्ती, डॉ. सरला आरबोळे, डॉ. सरोज बिडकर, डॉ. संदीप परीट, डॉ. दयानंद पाटील, प्रा. महेश वंडकर, प्रा. नितीन माने, डॉ. श्रीकांत पाटील, प्रा. महेश कदम, प्रा. अश्विन गोडघाटे, डॉ. किरण पाटील यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सहसचिव गजेंद्र बंदी, अजित वाळकी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. नीलेश शेळके यांनी केले. प्रा. ओंकार खतकल्ले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सचिन जानवेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 3 AUG 2026
सकाळ

# चीनपासून सुरक्षेबाबत सावध भूमिका गरजेची

## डॉ. अशोक चौसाळकर : भारत-चीन संबंधांवर विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्रात भाष्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : चीनसोबत आर्थिक संबंध वाढवत असतानाच भारताने राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने सावध राहणे आवश्यक आहे. सीमावाद, चीन-पाकिस्तानची वाढती जवळीक आणि चीनचे वाढते वर्चस्व यामुळे भारत-चीन संबंध गुंतागुंतीचे झाले आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग आणि एक्स सर्व्हिसेस लीगतर्फे लेफ्टनंट जनरल एस. पी. पी. थोरात यांच्या १२० व्या जयंतीनिमित्त 'भारताचे सुरक्षा धोरण आणि भारत-चीन संबंध' या विषयावर झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार अध्यक्षस्थानी, तर बाळ पाटणकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, १९६२ मध्ये झालेल्या भारत-चीन युद्धात भारताकडे लष्करी साधनांची कमतरता होती, हा समज योग्य नसून नेतृत्वातील मतभेद आणि निर्णय क्षमतेच्या अभावामुळे उपलब्ध सामर्थ्याचा प्रभावी वापर झाला नाही. गलवान संघर्षानंतर दोन्ही देशांतील विश्वासाचे संकट कायम असून, चीनने विज्ञान-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि लष्करी आधुनिकीकरणात मोठी झेप घेतल्याचे त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात लेफ्टनंट जनरल एस. पी. पी. थोरात यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी झालेल्या चर्चासत्रात बोलताना डॉ. अशोक चौसाळकर. शेजारी डॉ. श्रीराम पवार, बाळ पाटणकर, सी. जे. रानडे, टी. एम. सूर्यवंशी, एन. एम. पाटील आदी.

डॉ. श्रीराम पवार म्हणाले, चीनच्या १९६२ दरम्यानच्या अनुभवातून भू-राजकीय आणि भू-आर्थिक हालचालींचा गांभीर्याने अभ्यास करण्याची गरज आहे. 'मैत्री ठेवा; पण सतत सावध राहा', ही भूमिका भारताने स्वीकारावी, असे स्पष्ट केले.

पाटणकर म्हणाले, जनरल एस.पी. पी. थोरात तत्त्वनिष्ठ आणि दूरदृष्टीच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. पुण्यातील खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए), कोल्हापुरातील गोल्फ कोर्स, न्यू पॅलेसमधील नवीन राजवाड्यातील संग्रहालय आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती या महत्त्वपूर्ण बाबींत त्यांचे योगदान महत्त्वाचे होते.

डॉ. यशवंतराव थोरात यांच्या संदेशाचे वाचन डॉ. प्रल्हाद माने यांनी केले. कर्नल सी. जे. रानडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नेहा वाडेकर, मोसीम पठाण यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय सावंत यांनी आभार मानले.

डॉ. प्रकाश पवार, कर्नल विक्रम नलावडे, नायब सुभेदार टी. एम. सूर्यवंशी, सुभेदार एन. एम. पाटील, डॉ. अरुण भोसले, डॉ. अवनीश पाटील, सुरेश शिपूरकर, डॉ. सुरेश शिखरे आदी उपस्थित होते.

### देशाने स्वायत्ततेला प्राधान्य द्यावे

डॉ. चौसाळकर म्हणाले, लडाख, अक्साई चीन आणि अरुणाचल प्रदेशातील सीमावादांसोबतच चीन-पाकिस्तानचे आर्थिक व सामाजिक सहकार्य भारतासाठी महत्त्वाचे सुरक्षाविषयक आव्हान आहे. देशाने चीनशी संवादाचे मार्ग खुले ठेवतानाच आर्थिक अवलंबित्व कमी करणे आणि राष्ट्रीय सुरक्षा व सामाजिक स्वायत्ततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

13 AUG 2026

जनप्रवास


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारत-चीनमध्ये सावधगिरी आवश्यक

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारत आणि चीन हे आशियातील दोन प्राचीन संस्कृती असलेले आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे देश आहेत. मात्र, सीमावाद, चीन- पाकिस्तानची वाढती जवळीक, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील चीनचे वर्चस्व आणि भारत-अमेरिका संबंध यांमुळे दोन्ही देशांमधील संबंध गुंतागुंतीचे झाले आहेत. त्यामुळे चीनसोबत आर्थिक संबंध वाढवत असतानाच भारताने सुरक्षेच्या दृष्टीने सातत्याने सावध राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.




**शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर. मंचावर डॉ. श्रीराम पवार, बाळ पाटणकर, नायब सुभेदारडी. एम. सूर्यवंशी, सुभेदार एन.एम. पाटील आदी.**

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग आणि एक्स सर्व्हिसेस लीग यांच्या संयुक्त विद्यमाने लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात यांच्या १२० व्या जयंतीनिमित्त आयोजित 'भारताचे सुरक्षा धोरण आणि भारत-चीन संबंध' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार अध्यक्षस्थानी होते. बाळ पाटणकर प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. चौसाळकर म्हणाले, १९६२ च्या युद्धाच्या संदर्भात भारताकडे लष्करी सामर्थ्याची कमतरता होती, हा समज पूर्णपणे योग्य नाही. त्या वेळी भारताकडे मोठ्या प्रमाणात सैन्य, रणगाडे आणि सक्षम हवाई साधने होती; मात्र नेतृत्वातील मतभेद आणि निर्णयक्षमतेच्या अभावामुळे उपलब्ध सामर्थ्याचा प्रभावी वापर होऊ शकला नाही, असे त्यांनी नमूद केले. आर्थिक सुधारणांनंतर चीनने विज्ञान-तंत्रज्ञान, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच लष्करी आधुनिकीकरणामध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे आजचा चीन हा केवळ आर्थिक महासत्ता नसून तंत्रज्ञान आणि लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनेही प्रभावशाली शक्ती बनला आहे.

डॉ. श्रीराम पवार म्हणाले, भारत आणि चीन हे आशियातील दोन मोठे देश असून, दोघांनाही जागतिक राजकारणात प्रभावी भूमिका बजावायची आहे. त्यामुळे दोन्ही देशांतील स्पर्धा आणि तणाव दीर्घकाळ कायम राहण्याची शक्यता आहे. जनरल थोरात यांनी त्यावेळी केलेल्या लष्करी अभ्यासातून चीनच्या संभाव्य हालचालींचा अचूक अंदाज घेण्याची आणि युद्धाच्या परिस्थितीत प्रभावी प्रतिकाराची आवश्यकता अधोरेखित केली होती. आजच्या परिस्थितीत चीनसोबत मैत्रीपूर्ण संबंध आणि आर्थिक सहकार्य आवश्यक असले, तरी भारताने 'मैत्री ठेवा, पण सतत सावध राहा' ही भूमिका स्वीकारणे गरजेचे आहे.

बाळ पाटणकर यांनी आठवणींना उजाळा दिला. यावेळी डॉ. प्रल्हाद माने यांनी डॉ. यशवंतराव थोरात यांच्या संदेशाचे वाचन केले. कर्नल सी.जे. रानडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.नेहा वाडेकर यांनी परिचय करून दिला. मोसीम पठाण यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय सावंत यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. प्रकाश पवार, कर्नल विक्रम नलावडे, नायब सुभेदार टी.एम. सूर्यवंशी, सुभेदार एन.एम. पाटील, डॉ. अरूण भोसले, डॉ. अवनीश पाटील, सुरेश शिपूरकर, डॉ. सुरेश शिखरे आदी उपस्थित होते.

1 3 AUG 2026

पुढारी

# विद्यापीठात 'प्रतिसरकार'मधील महिलांच्या योगदानावर आज राज्यस्तरीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १३) मानव्यशास्त्र सभागृहात 'प्रतिसरकारची चळवळ : रणरागिणी रणी ठाकल्या' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित केले आहे.




चर्चासत्राचे बीजभाषण ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर करणार आहेत. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत असतील. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, सरोज (माई) पाटील व अरुण लाड प्रमुख उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्रात प्रतिसरकार चळवळीतील कर्तृत्ववान महिलांचे कार्य, त्यांचे योगदान व स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग यावर विविध तज्ज्ञ व संशोधक तीन सत्रांत विचार मांडणार आहेत. समारोप सत्रात डॉ. भारती पाटील मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असतील. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

13 AUG 2026

कुमारक्रांती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची सांख्यिकी अधिकारी पदावर निवड



**कोल्हापूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेण्यात आलेल्या सांख्यिकी अधिकारी/ संशोधन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) पदाच्या भरती प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयातील सांख्यिकी अधिकारी (DSO)/संशोधन अधिकारी (RO) या पदासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पृथ्वीराज विठ्ठल झांबरे, आदिनाथ तुकाराम पाटील, रविंद्र एकनाथ देवरे, सोनम श्रीकांत पाटील, निकेत गणेश जाधव, स्वनिल सतीश माने, तेजश्री मनमोहन राजे आणि विद्या बाळासाहेब वालकोळी यांचा समावेश आहे. अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांच्यासह सर्व शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या भरती प्रक्रियेत राज्यभरातून निवड झालेल्या २५ उमेदवारांपैकी शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, हे प्रमाण ३२ टक्के इतके आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या गुणवत्तापूर्ण अध्यापन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची प्रभावी परंपरा पुन्हा अधोरेखित झाली आहे.

संख्याशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आज केंद्र व राज्य शासनाच्या अनेक महत्त्वाच्या पदांवर येथील विद्यार्थी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रांतही विविध पदांवर विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. आज आठ विद्यार्थ्यांच्या यशामुळे अधिविभागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता नव्याने अधोरेखित झाली आहे. विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांसाठीही त्यांचे यश प्रेरणादायी आहे. या विद्यार्थ्यांसह त्यांचे मार्गदर्शक अभिनंदनास पात्र आहेत, असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केले आहेत.

1 3 AUG 2026
सकाळ




कोल्हापूर : नवे शैक्षणिक धोरण विषयक कार्यशाळेत प्रा. डॉ. प्रदीप खेडकर यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. रवींद्र भताने, प्रा. डॉ. निखिल गायकवाड.

# नव्या शैक्षणिक धोरणात ग्रंथपाल, क्रीडा शिक्षकांना महत्त्व : डॉ. खेडकर

कोल्हापूर, ता. १२ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. बदलत्या उच्च शिक्षण व्यवस्थेच्या अनुषंगाने त्यांच्या कार्यपद्धतीत आवश्यक बदल होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे राज्याचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप खेडकर यांनी केले.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची भूमिका व आव्हाने' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा शिवाजी विद्यापीठात झाली. यामध्ये डॉ. खेडकर बोलत होते. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. राज्य समितीचे सदस्य डॉ. अनिल राव यांनी बीजभाषण केले. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण क्षेत्रात होत असलेले बदल, त्यातील संधी आणि संस्थांनी स्वीकारावयाच्या नव्या कार्यपद्धती याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोपाच्या सत्रात डॉ. अजय शाळी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. रवींद्र भताने, डॉ. शिरीष पोपरे यांनी विविध सत्रांमध्ये व्याख्याने दिली. प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड, प्रा. महेश केसरकर, डॉ. शार्दुल सेलुकर, डॉ. राहुल माने, डॉ. कृष्णा पवार आणि डॉ. संग्राम मोरे यांची उपस्थिती होती. कार्यशाळेत प्राध्यापक, क्रीडा शिक्षक, ग्रंथपाल सहभागी झाले होते. सूत्रसंचालन डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी केले. आभार क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी मानले.

1 3 AUG 2026

पुढारी

# आंतरराष्ट्रीय प्रेमचंद सन्मानाने डॉ. अर्जुन चव्हाण यांचा गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्येष्ठ हिंदी लेखक, समीक्षक व शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांना वर्ष २०२६ चा 'आंतरराष्ट्रीय प्रेमचंद सन्मान' देऊन गौरविण्यात आले.

नार्वे येथील 'भारतीय-नॉर्वेजीय सूचना एवं सांस्कृतिक फोरम' या संस्थेच्या वतीने हिंदी कथा सम्राट प्रेमचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन आंतरराष्ट्रीय संमेलनात सन्मानाची घोषणा करण्यात आली.

हिंदी साहित्य लेखन, कथा-कविता निर्मिती व हिंदी भाषेच्या



प्रचार-प्रसारातील योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

डॉ. चव्हाण यांनी ६५ हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. दोनशेहून अधिक हिंदी कथांचे लेखन केले आहे. यापूर्वी त्यांना विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

सध्या 'जागतिक हिंदी परिषद' या आंतरराष्ट्रीय संस्थेचे अध्यक्ष (महाराष्ट्र प्रदेश) म्हणून ते कार्यरत आहेत.

1 3 AUG 2026

पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयात 'बौद्धिक संपदा हक्क' विषयावर कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व संशोधन विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'बौद्धिक संपदा हक्क, पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क अर्ज प्रक्रिया' या विषयावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. चीनमधील हेनान विद्यापीठाचे प्रा. शान्हू लिऊ, शिवाजी विद्यापीठाचे डॉ. डी. टी. डोंगळे आणि राजाराम महाविद्यालयाचे प्रा. डॉ. पी. यू. लांडे यांनी संशोधकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी संशोधकांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण मिळवून देण्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. कार्यशाळेत पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क व अर्ज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. डॉ. शुभांगी काळे व डॉ. संजय लठ्ठे यांनी केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. टी. दागंट यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अतिश पाटील यांनी आभार मानले.

1 3 AUG 2026

पुढारी

# शहाजी महाविद्यालयात क्रांतिदिन उत्साहात

**कोल्हापूर :** शहाजी महाविद्यालयात ९ ऑगस्ट क्रांतिदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भित्तिपत्रके साकारून स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाला उजाळा दिला. तसेच, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण आणि 'ऑगस्ट क्रांती व आजचा युवक' या विषयावर मनोगत व्यक्त केली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी ९ ऑगस्ट १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले. युवकांनी देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना जोपासावी, असे आवाहन केले. यावेळी डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. ए. बी. बलुगडे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. के. एम. देसाई, प्रबंधक रवींद्र भोसले उपस्थित होते..